नकाच बदलू कोणी

बंदीतली कवाडे
उघडू नकाच कोणी
आहेच गाडलेले
उकरू नकाच कोणी ॥

धर्मात वर्णिलेले
ते पाळतोच आम्ही
डोळे सताड उघडे
उघडू नकाच कोणी ॥

वंशात वाढलेल्या
शतकात गाडलेल्या
अप्रिय त्या रुढींना
उकरू नकाच कोणी ॥

आम्हास काय देणे
स्वच्छंद या जगाचे ?
उघडू नकाच दारे
अमुच्या तमास कोणी ॥

अमुचे आम्हास वाटे
चुकले जरा परंतु
पण धार्जिण्या जगाला
सांगू नकाच कोणी ॥

– शशिकांत पानट
('अमेरिका तरंग' या कवितासंग्रहातून)